# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.09.2024** **वार – गुरुवार**

---

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नियोजित पुणे दौरा मुसळधार पावसामुळे रद्द करण्यात आला आहे. पुणे मेट्रोच्या जिल्हा सत्र न्यायालय ते स्वारगेट या भुयारी मार्गाचं लोकार्पण, स्वारगेट ते कात्रज या विस्तारित भुयारी मार्गाचं भूमिपूजन तसंच अन्य काही महत्त्वाच्या प्रकल्पाचं लोकार्पण आणि उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार होतं. गेल्या दोन दिवसांपासून पुणे शहरात मुसळधार पाऊस पडत आहे; आजही जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे; त्यामुळे पंतप्रधानांचा पुणे दौरा रद्द करण्यात आला आहे. दरम्यान तीन परम रुद्र सुपर कम्प्युटर आणि हवामानविषयक अत्याधुनिक संगणकीय प्रणालीचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते आज दूरस्थ माध्यमातून काही वेळापूर्वी करण्यात आलं.

**मेट्रो**

पुणे मेट्रोचा आज होणारा उद्घाटन समारंभ रद्द झाल्याने जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानक ते स्वारगेट मेट्रो स्थानक ही सेवा कार्यान्वित नसल्याचं मेट्रो प्रशासनानं म्हटलं आहे. नियोजित उद्घाटन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर मेट्रो प्रवासी सेवेत आज जे इतर बदल करण्यात आले होते; तेही रद्द करण्यात आले असून मेट्रो सेवा नियमितपणे सुरु राहील असं पुणे मेट्रोनं कळवलं आहे.

**धंगेकर**

दरम्यान राजकारण बाजूला ठेवून पुणे मेट्रोच्या मार्गिकेचं उद्घाटन करायला हवं; ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते हे उद्घाटन करून हा भुयारी मार्ग सुरू करावा अशी मागणी आमदार रवींद्र धंगेकर यांनी केली आहे.

**गांधी सप्ताह**

महात्मा गांधीजींच्या जयंतीच्या अनुषंगानं पुण्यात येत्या 1 ते 7 ऑक्टोबर या कालावधीत 'राष्ट्रपिता महात्मा गांधी सप्ताहा'चं आयोजन करण्यात आलं आहे. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलातर्फे आयोजित या सप्ताहामध्ये महात्मा गांधींच्या विचारांचा प्रसार, व्याख्यानं, परिसंवाद, पुस्तक प्रकाशन, भजन, शांतता फेरी, खादी प्रदर्शन, गांधी चित्रपट महोत्सव असे विविध कार्यक्रम होणार आहेत. कोथरूड इथल्या गांधी भवनात हे कार्यक्रम होतील अशी माहिती गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते या उपक्रमाचं उद्घाटन होणार आहे.

**मागणी**

फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावं पुणे महापालिका हद्दीतून वगळून स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे. या गावांमधील खर्चाचा भार महापालिकेवर टाकणं चुकीचं असून या कामांसाठी शासनाने महापालिकेला 300

कोटी रुपयांचं अनुदान तातडीने द्यावं, अशी मागणी माजी नगरसेवकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर, तसंच सुहास कुलकर्णी, प्रशांत बधे यांनी ही मागणी केली आहे. या गावातील नगररचना योजनेचे जवळपास 1 हजार 171 कोटी रुपये महापालिकेने माफ केले आहेत. त्यामुळे एक हजार कोटी रुपये टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करावेत, असं त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>ससून</u>**

बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयात गेल्या वर्षात पाच वैद्यकीय अधीक्षक नेमण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक नेमण्याचे अधिकार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना आहेत. मात्र, या पदाच्या नियुक्तीसाठी राजकीय वशिलेबाजी केली जाते. यामुळे अधीक्षक नेमण्याचे अधिकार अधिष्ठात्यांकडून काढून घेण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य सरकारच्या पातळीवर घेण्यात येणार असल्याचं पुणे वैद्यकीय शिक्षण विभागानं म्हटलं आहे. राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांतील वैद्यकीय अधीक्षकपदांचा यासाठी आढावा घेण्यात येत असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**<u>स्टेट बँक</u>**

विकसित भारताचं ध्येय साध्य करण्यासाठी आगामी 5 वर्षे महत्त्वाची असून त्यामध्ये स्टेट बँकेसह एकंदर बँकिंग क्षेत्राचं वैशिष्ट्यपूर्ण योगदान असेल असा विश्वास स्टेट बँक ऑफ इंडियाचे उपव्यवस्थापकीय संचालक बिनोदकुमार मिश्रा यांनी नुकताच पुण्यात व्यक्त केला. स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

**<u>पिंपरी चिंचवड पाऊस</u>**

पुणे आणि परिसरात काल झालेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झालं होतं. पिंपरी चिंचवड शहरातही काल जोरदार पाऊस झाला; त्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. पवना, मुळा आणि इंद्रायणी नदीच्या पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता असून नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क रहावं असं आवाहनही सिंह यांनी केलं आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अतिरिक्त आयुक्तांवर क्षेत्रीय कार्यालयनिहाय समन्वय ठेवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आजही पावसाची संततधार सुरू आहे. हवामान विभागानं आजही मुसळधार पावसाचा इशारा दिला होता; त्यामुळे पुण्यातील शाळा महाविद्यालयांना सुटी देण्यात आली होती. पुणे आणि परिसरात उद्याही सोसाट्याचे वारे आणि वीजांसह पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**